ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

# सामाजिक परिवर्तनातील बदलती मुल्ये

*श्रीकांत कुलकर्णी,

* बदलापूर (प) ४२१५०३

बामनाची पोर भावासोबत शाळेत गेली. अक्षर वाचून लिहायला लागली. मैत्रिणसंग नाचगणी शिकली. स्पर्धा मधून बक्षीस पटकावली. जोडीदारसंग बागडायला गेली. नटूनथटून सिनेमात घुसली. पैकावाल्ल्याचा नाद धरुन परदेशात गेली. चकणा म्हौऱ्याची हौस पुरवून मायदेशी परतली. लग्नापूर्वीच बया पोटुशी राहिली. पतिबीना माता जाहली. मुलगी शिकली. मोठ्ठी झाली. बाप्याच्या खांद्याला खांदा भिडवून पुढे गेली. सेवा व्रत अंगीकारून राजकारणात उतरली. गृहिणी नात्याने स्वयंपाक घरात डाव्या हाताने कांदा फोडणे, दोन्हीही हातांनी गुळाची ढेप फोडणे, वा उजव्या हाताने नारळही न फोडता येणारी बामनाची बया आता घर गृहस्थी सोडून सिनेमा आणि दूरदर्शनवरील मालिकांचे अनुकरण करीत करीत. राजकारणात गलिच्छ, वा अति लोभापोटी राजकारणात व हव्यासाने समाज सेवा अंगीकारून कार्यकर्त्यांची थोबाड व नेत्यांची माथी फोडायला सरसावली.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

मुलगी शिकली, प्रगती झाली आधुनिकतेच्या नावाखाली ९९ टक्के हिंदु मुली वाया जात चालल्यात...आज रोजी कमीत कमी कपडे घालुन फिरत असलेल्या ९९% मुली या हिंदु आहेत... अश्लिलतेमुळे बलात्काराला बळी पडत असलेल्या ९९% मुली हिंदु आहेत... मुसलमान मुलींना त्यांची संस्कृती जपायची आहे पण हिंदु मुलींना पाश्चात्य संस्कृती जवळ करायची आहे.. मी हिजाब आणी बुरख्याच्या विरोधातच आहे शंभर टक्के परंतु हिजाबवरुन पेटलेल्या मुस्लीम मुली बघुन वाईट वाटलं की, हिंदु मुलींना स्वधर्माबाबत कसलीही आपुलकी नाही. परकीय ख्रिश्चनांचे अनुकरण करण्यातच धन्यता मानत असलेल्या हिंदु मुली साडी, पंजाबी ड्रेस घालणं कमी पणाचं समजतात हे दुर्दैवच आहे...

पूर्वी वयात आलेली मुलगी संध्याकाळच्या आत घरात असायची, घरकामात मदत करायची. आता एकदा स्वयंपाक घरात येऊन खायला काय आहे ते बघते आणि स्वतःच्या खोलीत जाऊन परस्पर ऑर्डर करून खाणं मागवते. हा बदल केव्हा झाला......? लग्ना अगोदर मुला-मुलीने एक-दोन वेळा भेटणे म्हणजे पुढारलेपण मानणारे आता नातवंडांचे लिव इन रिलेशनशिप स्वीकारतात. हा बदल केव्हा झाला.....?

बामनाची पोर भावासोबत शाळेत गेली. अक्षर वाचून लिहायला लागली. मैत्रिणसंग नाचगणी शिकली. स्पर्धा मधून बक्षीस पटकावली. जोडीदारसंग बागडायला गेली. नटूनथटून सिनेमात घुसली. पैकावाल्ल्याचा नाद धरुन परदेशात गेली. चकणा म्हौऱ्याची हौस पुरवून मायदेशी परतली. लग्नापूर्वीच बया पोटुशी राहिली. पतिबीना माता जाहली. मुलगी शिकली. मोठ्ठी झाली. बाप्याच्या खांद्याला खांदा

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II Nov – Dec 2022

OPEN ACCESS Original Research Article

भिडवून पुढे गेली. सेवा व्रत अंगीकारून राजकारणात उतरली. गृहिणी नात्याने स्वयंपाक घरात डाव्या हाताने कांदा फोडणे, दोन्हीही हातांनी गुळाची ढेप फोडणे, वा उजव्या हाताने नारळही न फोडता येणारी बामनाची बया आता घर गृहस्थी सोडून सिनेमा आणि दूरदर्शनवरील मालिकांचे अनुकरण करीत करीत. राजकारणात गलिच्छ, वा अति लोभापोटी राजकारणात व हव्यासाने समाज सेवा अंगीकारून कार्यकर्त्यांची थोबाड व नेत्यांची माथी फोडायला सरसावली. *मुलगी शिकली, प्रगती झाली*.

हिंदु मुलींनी सुद्धा धर्मनिष्ठा जपली पाहीजे. आपले संस्कार जपले पाहिजेत. मुसलमान मुलींना बुरखा घालुन फिरायला लाज वाटत नाही पण हिंदु मुलींना कपाळी कुंकु, टिकली लावायला लाज वाटते हे सत्य आहे, दुर्दैव आहे....कुठतरी चुकतय ते सुधारलं पाहीजे... हा बदल नक्की केव्हा झाला?

वीस पंचवीस वर्षांपूर्वी नोकरी करणारा मुलगा पगार निमूटपणे वडिलांच्या हातात देत होतो..! मग वडील त्यातून घरातला काही खर्च करायचे, थोडी बचत केली जायची आणि मुलाला येण्याजाण्याच्या तिकीटापुरते आणि दिवसाला फार तर एक चहा पिता येईल इतके पैसे दिले जात होते. आता मुलाला पगार किती मिळतो हे विचारायला आई-वडील कचरतात. मुलगा त्या पैशाचे काय करतो हे विचारायची हिम्मत/इच्छा आई-वडिलांकडे नसते. हा बदल केव्हा झाला....?

कृपया मोहाच्या बळी न पडता, ध्येयासाठी पछडणे ह्या कर्तव्यात चुकला. तो सुवर्ण संधीस मुकला.

वर्षातून एकदा होळीच्या वेळी मोठ्या लोकांपासून लपून भांग पिण्याचा कार्यक्रम ठरवणारी आता प्रौढ झालेली माणसं घरातल्या तरुण मुलापुढे सहज ग्लास भरु लागली. हा बदल कधी झाला....?

पाककृतींमध्ये तवा हे साधन असते. पित्याने आंच देणे हे त्यांचे कौटुंबिक प्रगती साधणे कर्तव्य आणि ध्येय असते. तर आपल्याला सुविधा म्हणून हाती लाभलेल्या पारंपरिक वारसांचे आणि साधन संमृध्दीचे अंगभूत गुणांचे कौशल्य साधनेने ध्येय सिद्ध होण्यात रुपातर खरे उद्दिष्ट तव्यावरील चपात्यांचे लक्ष. म्हणून यथायोग्य कर्तव्य पाडणे. तसेच पित्याच्या काबाडकष्टांना पुत्राने तेवढ्याच बुद्धिचातुर्याने,मेहनतीने प्रामाणिकपणे आणि एक निष्ठेने साथ देऊन दैदिप्यमान यश, कीर्ती आणि संमृध्दी साधणे. ही दोन्ही आपापल्या भुमिकेत श्रेष्ठ आहेत.

नातवंडांना जवळ घेणारी, नातीच्या केसांना तेल लावून देणारी, गोष्टी सांगणारी आजी, आता सकाळी योगा क्लास नाहीतर लाफ्टर क्लासला जाते आणि नातवंडांशी टीव्हीच्या रिमोटसाठी भांडते. हा बदल केव्हा झाला.....?

घरातल्या कोणाशी बोलत नाहीत अशांना कौन्सिलर जवळचा वाटतो. त्याला पैसे देऊन त्याचा सल्ला मानतात. पण स्वतःच्या भावंडांवर विश्वास ठेवायला तयार नसतात. तोच प्रकार पैशाच्या व्यवहाराबद्दल. नवरा-बायको दोघेही कमावतात. पण कुठे खर्च झाले, किती गुंतवले, कुठे गुंतवले, ते फक्त सीएला माहित असते. मुलीच्या संसारातले सगळे लहानसहान तपशील जाणून घेणारे आई-वडील, मुलगा आणि सुनेच्या बाबतीत मात्र अलिप्त राहतात. असं का होतंय.....?

वडीलधा-यांचा मान ठेवणा-यांच्या मुली नवऱ्याचा येता-जाता अपमान करतात, सगळ्यांसमोर उणं-दुणं काढतात. अशा वेळी

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– II

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

मुलीचे आई-वडील कसनुसं हसतात आणि मुलाचे आई-वडील हतबुद्ध होतात. हा बदल कधी झाला.......?

तरुण मुले एक नोकरी सोडतात, दुसरी धरतात. राहत्या गावातून दुसऱ्या गावी जातात. सगळे ठरल्यावर आई-वडिलांना फक्त सांगितलं जातं. त्याच्यापेक्षा कमी महत्त्वाच्या गोष्टींमध्ये तर आई-वडिलांना सांगण्याचीही गरज नसते. मित्रांबरोबर ट्रीपला जाणे, ब्रेकअप होणे, सिनेमाला जाणे, पार्टी करणे, स्वतःसाठी नवीन वस्तू, फोन, कपडे वगैरे खरेदी करणे, अशा गोष्टीत आई-वडिलांनी दखल दिलेली मुलांना आवडतं नाही. असं का होतं..? हा बदल कधी झाला.......?

आम्ही नोकरी करतो, लागू असलेले सर्व कर भरतो. व्यापाऱ्यांसारख्या उद्योजकांचे प्रामणे कोणतीही सवलत मागत नाही. कोणासही शिव्या देत नाही/ धाकधपटशहा करीत नाही. जर मनाने पटले नाहीतर स्थलांतर करून शांततामय जीवन जगण्याचे आव्हेरत नाही.

नातेवाईकांकडे जाणं, शेजाऱ्यांकडे वेळप्रसंगी जाणं, लग्न समारंभात सहभागी होणं, कुळाचार पाळणे, देवळात जाणे, पूजा करणे, इत्यादी गोष्टींवर आता काही घरात नाराजी नाही तर भांडणे होतात. असं का होतं...? हा बदल कधी झाला.......?

मान्य आहे, दोन पिढ्यांमध्ये अंतर असतेच. पाचवारी नेसणाऱ्या सुनेबद्दल नऊवारी नेसणाऱ्या सासूने तेव्हाही नाराजी व्यक्त केली होती. पण आता पन्नाशी पार केलेल्या पिढीत आणि त्यांच्या मुलांच्या पिढीत अंतर नाही दरी निर्माण झाली असं वाटतं. हा बदल नक्की केव्हा झाला......?

कृपया मोहाच्या बळी न पडता, ध्येयासाठी पछडणे ह्या कर्तव्यात चुकला. तो सुवर्ण संधीस मुकला. खरंच विचार करायला हवा. समाज प्रगतीकडे नव्हे तर अधोगतीकडे चालल्याचे हे भयंकर वास्तव आहे. आणि ते सहजासहजी पचनी पडणारेही नाही हे मोठे _दुर्दैव_ आहे.

**Cite This Article:**

** श्रीकांत कुलकर्णी,(2022)* सामाजिक परिवर्तनातील बदलती मुल्ये, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No. XI (Special Issue-II), 134-136.*